Vol 6 Issue 2 Nov 2016

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor :3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 2 | November - 2016

Review Of Research

# कृषी व्यवसायाच्या भारतातील विविध संधी

प्राचार्य . डॉ . केंजळे . एस . आर .
मु . सा . काकडे महाविद्यालय सोमेश्वरनगर, ता . बरामती, जि . पुणे .

### प्रस्तावना :–

भारत हा खेडयांचा देश समजला जातो. खेडयातील लोकांचा प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी शेतीवर अवलंबून असणा–या लोकांचे प्रमाण अधिक आहे. भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये शेतीपासून मिळणा–या उत्पन्नाचा वाटा इतर उदयोगांपेक्षा अधिक आहे कारण बरेचशे उद्योग व्यवसाय हे शेती पासून मिळणा–या कच्च्या मालावर आधारित आहेत. भारत हा तरूणांचा देश समजला जातो परंतु आज 'शहराकडे चला' या संकल्पनेने जोर धरला असल्यामुळे भारतातील तरूण पिढी शेती ऐवजी इतर व्यवसायांकडे वळत असल्याचे दिसून येते. त्यामागील कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील. पावसाची अनियमितता दुष्काळ, शेती उत्पन्नाचा अस्थिर भाव, शेती व्यवसायातील तोटा, वाढत्या लोकसंख्येला लागणारी घरे शेतजमिनीवर बांधली जात असल्याने शेती क्षेत्र कमी होत आहे. शेतीच्या भावाभावामधील वाटण्या होत असल्याने जमिनीचे तुकडयांमध्ये रूपांतरण होत आहे.भारतीय शेतक–यांचे हित जपण्यासाठी, जागतिकीकरण व आर्थिक उदारीकरणाचे फायदे मिळण्यासाठी देशातील कृषिमाल विपणन व्यवस्थेत नवीन सुधारणांना वेग आला आहे. शेतमाल विक्रीमध्ये शेतक–यांनी मागील हंगामात भाजीपाल्यांची, फळांची प्रमुख बाजारपेठेत झालेली आवक, त्यांचे बाजारभाव आणि त्यांच्या निर्यातीबाबतची सविस्तर माहिती करून घेणे सध्याच्या परिस्थितीत क्रमप्राप्त झाले आहे. कोणत्या बाजारपेठेत, कोणत्या शेतीमालाला, केंव्हा जास्त मागणी असते व केंव्हा त्यांचा तुटवडा असतो याचा विचार करून माहिती घेवून पिकाखालील क्षेत्राचे नियोजन करून उत्पादन घ्यावे.

### अभ्यास विषय :–

संबंधित संशोधन प्रकल्प हा शेती व्यवसायाच्या भारतातील विविध संधीशी संबंधित आहे.

भारतामधील संपूर्ण व्यवसायांमध्ये शेती व्यवसायाचा वाटा फार मोठा व मोलाचा मानला जातो. भारतात 80: लोकसंख्या शेती व्यवयासावर असलंबून आहे. परंतु आजची तरूण पिढी शेती ऐवजी इतर व्यवसायाला प्राधान्य देत असल्याचे दिसून येत असल्याने भारतात शेती व्यवसायाला कोणत्या संधी भविष्यात मिळू शकतात हे सांगण्यासाठी हा संशोधन प्रकल्प केला आहे.

### संशोधन हेतू विधाने :–

या अभ्यासाचे महत्वाचे हेतू पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1. कृषी व्यवसायाच्या महत्वाचे विश्लेषण करणे.
2. कृषी व्यवसायाच्या भारतातील भविष्यात असणा–या संधीचा अभ्यास करणे.
3. कृषी व्यवसायाची खरी परिस्थिती शोधून काढणे.

### अभ्यासाची गृहितक विधाने :–

वरील हेतूनुसार त्यांची गृहितके खालीलप्रमाणे तपासून पाहता येतात.

1. भारतातील शेतीपैकी बरिचशी शेतजमीन ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.
2. भारतीय शेतकरी शेतीचे व्यवस्थापन शास्त्रीय पद्धतीने करत नाहीत.
3. भारतातील बरेचशे व्यवसाय कृषी क्षेत्रावर अवलंबून आहेत.

### व्याख्या :–

### कृषी व्यवसाय म्हणजे :–

''कृषी व्यवसाय हे एक शास्त्र व कला आहे की, ज्यामध्ये पिकांचे उत्पादन करणे व जनावरे पाळणे इत्यादींचा समावेश होतो''.

### माहिती संकलन :–

**प्राथमिक स्त्रोत :–** संशोधकाने खालील स्त्रोतांच्या सहाय्याने प्राथमिक स्वरूपाची माहिती गोळा/सकंलित केली आहे. प्रत्यक्ष निरीक्षण मुलाखती दूरध्वनी मुलाखत प्रत्यक्ष भेटी अनुसूची प्रश्नावली

**दुय्यम स्त्रोत :–** संशोधकाने खालील स्त्रोतांच्या सहाय्याने दुय्यम स्वरूपाची माहिती गोळा/सकंलित



केली आहे. प्रकाशित प्रलेख अहवाल पुस्तके नियतकालिके मासिके साप्ताहिके वर्तमान पत्रे इंटरनेट संशोधकाचे शोध निबंध व इतर प्रकाशने अभिलेख प्रकाशित आकडेवारी अप्रकाशित प्रलेख गोपनिय अभिलेख संशोधन अहवाल

### *भारतातील कृषी व्यवसायाची सद्यस्थिती*

भारतीय कृषी व्यवसायाची सद्यस्थिती पुढील मुद्दयाद्वारे स्पष्ट करता येईल

1. भारतीय कृषी उत्पादनाला रास्त भाव मिळत नाही.
2. भारतातील शेती हंगामी मौसमावर आधारित केली जाते त्यामुळे त्यापिकाचा हंगाम संपल्यास ते पिक घेता येत नाही.
3. भारतीय शेती ही उत्पादनासाठी/व्यापारासाठी नव्हेतर उदरनिर्वाहाचे साधन म्हणून वापरली जाते. त्यामुळे शेतीचे व्यापारीकरण झाले नाही.
4. भारतीय शेतीमध्ये तज्ञांच्या मार्गदर्शनाचा उपयोग करून न घेता रासायनिक खतांचा वापर केला जात असल्याने शेतीचा कस कमी होत आहे.
5. भारतीय शेतीमध्ये योग्य व्यवस्थापन, नियोजन इत्यादींचा अभाव आढळतो.
6. भारतीय शेतकरी इतर पुरक व्यवसायांकडे लक्ष न देता फक्त पारंपारीक पद्धतीच्या शेतीकडे त्यांचा कल असल्याचे दिसून येते.
7. टाकाऊपासून टिकाऊ ही संकल्पना शेतीमध्ये राबवली जात नाही.
8. भारतीय शेतक—यांना अंतरपिकांची योग्य माहिती नसल्यामुळे ते एका हंगामात एकच पिक काढतात. त्यामुळे मिळणारा नफा कमी होतो.
9. शेतकरी आपल्या शेतातील माल स्वतः विक्री न करता इतर दलालांमार्फत विकतात त्यामुळे त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला त्यांच्यापर्यंत पोहचत नाही.
10. शेतक—यांच्या मालाची किंमत ते स्वतः ठरवत नसून सरकार व मध्यस्ती ती ठरवतात त्यामुळे त्यांच्या मालाला उत्पादन किंमतीपेक्षा कमी भाव मिळतो.
11. शेतक—यांना कृषी हवामान माती परिक्षण, जमीन खते, नवीन तंत्रज्ञान इत्यादीची माहिती नसल्याने शेतकरी पारंपारीक पिकांचेच उत्पादन घेत असल्याचे दिसून येते.
12. शेतक—यांचा माल नाशवंत स्वरूपाच्या असल्याने तो येईल त्या किंमतीला त्याला तो विकणे गरजेचे असते त्यामुळे त्यांना मोठया प्रमाणात तोटा सहन करावा लागतो. कारण त्यांना साठवणूकीच्या सोई, शितगृहे इत्यादींची माहिती नसते.
13. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतक—यांना मोठया प्रमाणात नुकसान भोगावे लागते.
14. भारतीय कृषि व्यवसायात उच्च तंत्रज्ञानाचा अभाव आढळतो.
15. भारतीय कृषि व्यवसायासाठी कुशल कामगारांची कमतरता आहे.

### *निरीक्षण व निष्कर्ष :—*

भारतातील कृषी व्यवसायाला असणा—या विविध संधी पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

#### *1) योग्य नैसर्गिक संतुलन :—*

वाढत्या लोकसंख्येला रहायला लागणारी घरे शेतजमिनीवर बांधली जात असल्याने मोठया प्रमाणात जंगलतोड, वृक्षतोड केली आहे व कॉग्रेसची जंगले वाढत आहे त्यामुळे नैसर्गिक असंतुलन मोठया प्रमाणात होत आहे. त्याला जर आळा बसवायचा असेल व शेतजमिनीची धूप कमी करायची असेल तर शेती सारखा दुसरा व्यवसाय नाही. जागतिक तापमानवाढीचे संकट सर्व जगाला भेडसावत आहे. विशेषतः कृषी क्षेत्रापुढे बदलत्या तापमानवाढीमुळे गंभीर प्रश्न आहे तो सोडवण्यासाठी मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे.

#### *2) उच्च तंत्रज्ञानावर आधारित शेती :—*

नवीन संशोधन तंत्रज्ञानाचा वापर करून सुधारित पद्धतीने शेती करणे यालाच उच्च तंत्रज्ञानावर आधारित शेती म्हणतात. नवीन संशोधन, तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेतक—यांना दर हेक्टरी कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन मिळवून नफ्याचे प्रमाण वाढवता येते. यामध्ये महत्वाचे उदाहरण म्हणजे हरितग्रह तंत्रज्ञान होय. उच्च तंत्रज्ञानावर आधारित पुष्प व भाजीपाला उत्पादनामुळे कमी जागेत चांगल्या प्रतीची व कमी खर्चात जास्त उत्पादन मिळवता येते. उच्च तंत्रज्ञानावर आधारित शेतीमुळे जास्त उत्पादन मिळत असल्याने स्वतःच्या गरजा भागवून ते उत्पादन आपण निर्यात करू शकतो. त्यामुळे जास्तीत जास्त परकीय चलन मिळवण्यासाठी याचा फायदा करता येवू शकतो.

#### *3) संशोधनाला वाव :—*

कृषी व्यवसायामध्ये शेती उत्पादने, शेतीची उत्पादकता, त्यामध्ये वापरत असणारी तंत्रज्ञाने, खते, अवजारे दुग्ध व्यवसाय गाई इत्यादी विषयी वेगवेगळी संशोधने करणे गरजेचे आहे कारण वाढत्या लोकसंख्येला आवश्यक असणा—या अन्नधान्याच्या गरजा व ग्राहकांच्या वेगवेगळया वस्तुला असणा—या मागण्या पूर्ण करण्यासाठी संशोधन महत्वाची बाब आहे. आज भारतामध्ये संशोधकाची मोठया प्रमाणात कमतरता आढळते कारण भारतात शेती संशोधनाला जास्त प्राधान्य मिळत नाही. त्यामुळे कृषी व्यवसायाशी संबंधित संशोधन करणा—या संशोधकांची भारतात मोठी गरज आहे ती गरज भागवण्यासाठी आता मोठया प्रमाणात संधी उपलब्ध होणार आहेत. भारतात बी.एस्सी, एम. एस्सी, ॲग्री करणा—या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. त्यांनी स्पर्धापरिक्षांऐवजी संशोधनाकडे वळणे गरजेचे आहे.

#### *4) सेंद्रिय शेती :—*

सेंद्रिय शेती ही मुळतः या देशातच सुरू झाली भारतातील शेतकरी 4000 वर्षापासून सेंद्रिय शेती करत आहेत. शेतीमध्ये मोठया

प्रमाणात रासायनिक खतांचा वापर झाल्याने उत्पादीत होणारे पिक व शेतजमीन यामध्ये रसायनांचे प्रमाण वाढत आहे असे रासायनिक उत्पादन मानवी शरीरासाठी घातक आहे व त्यामुळे शेतीचा कस कमी होत आहे. म्हणूनच आता सेंद्रिय शेतीला शेतकरी प्राधान्य देत असल्याचे दिसते. म्हणूनच आता सेंद्रिय खत तयार करून शेतक—यांना त्याचा पुरवठा करण्याचा व्यवसाय शेतकरी करू शकतो.

### *5) दुग्ध गाई पालन, मेंढी पालन, कुक्कुट पालन इत्यादी व्यवसाय :—*

कृषी व्यवसायात पिकांच्या उत्पादनाबरोबरच जनावर पालनाखाली तितकेच महत्व आहे. शेतकरी शेती बरोबरच जोड व्यवसाय म्हणून दुग्ध गाई पालन, मेंढी पालन, कुक्कुट पालन इत्यादी व्यवसाय करू शकतो. याचा शेतक—याला स्वतःच्या शेतीसाठी शेणखत, जैविक खत, नांगरणी, मळणी इत्यादींसाठी उपयोग करता येतो. तसेच शेतकरी गाई मेंढी यांना लागणारा चारा स्वतःच्या शेतात तयार करत असल्याने कमी खर्चात तो गाई,म्हशी पासून मिळणा—या दुधापासून वेगवेगळे पदार्थ तयार करणे. उदा. दुध, ताक, दही, आम्रखंड, श्रीखंड, आईस्क्रीम, पनीर इत्यादी पदार्थ तयार करण्याचा व्यवसाय करू शकतो. मेंढयापासून लोकर निर्मिती करू शकतो व कोंबडयांपासून मांस, अंडी मिळवण्याचा व्यवसाय करू शकतो.

### *6) रेशीम व्यवसाय :—*

शेतकरी स्वतःच्या शेतामध्ये तुतीच्या झाडांची लागण करून त्यापासून रेशीम तयार करण्याचा व्यवसाय करू शकतो. स्वतःच रेशीम उत्पादन करून त्यापासून वेगवेगळया प्रकारचे कपडे, वस्तु तयार करू शकतो. आज रेशीम उद्योगाला मोठया प्रमाणात मागणी असून त्याच्या निर्यातीपासून भारताला मोठया प्रमाणात परकीय चलन प्राप्त होवू शकतो.

### *7) ऊर्जा निर्मिती :—*

शेतकरी शेतामध्ये गाई, म्हशी व गुरे पाळत असल्याने त्यांचा शेणापासून तो खत निर्मिती करत असताना त्यापासून बायोगॅस व विज निर्मिती इत्यादी करू शकतो. आज नैसर्गिक गॅसचे प्रमाण कमी होत चालले आहे तसेच भारतातील अपुरा विज पुरवठा इत्यादी समस्यांना कृषी व्यवसायातील ऊर्जा निर्मितीमुळे तोंड देता येईल. आज शेतकरी स्वतःच्या घराला पुरेल ऐवजी विजनिर्मिती व बायोगॅस निर्मिती करू शकतो तसेच मोठया प्रमाणात याची निर्मिती केल्यास ऊर्जा निर्मितीचा व्यवसाय ही एक संधी शेतक—यांना आहे.

### *8) बायोडिझेल निर्मिती उद्योग :—*

वनस्पतीजन्य तेलापासून तयार केलेले इंधन म्हणजे बायोडिझेल होय.

बायोडिझेलमध्ये जवळपास 10ः प्राणवायू असल्यामुळे त्याचे संपूर्ण ज्वलन होते व त्यामधून काळा धूर निघत नसल्याने वातावरणातील प्रदुषण कमी होते व बायोडिझेल वापरण्यासाठी इंजिनमध्ये कोणताही बदल करावा लागत नाही तसेच बायोडिझेल तयार करण्याची पद्धत ही अत्यंत सोपी, सरळ असल्याने ते घरगुती पद्धतीने सुद्धा तयार करता येते.

भारतातील कोरडवाहू शेतीत वनएरंड व करंजसारख्यार कमी पाण्यावर जगणा—या झाडांची शास्त्रीय पद्धतीने लागवड केल्यास त्यापासून प्रती हेक्टर 1500 ते 2500 यामध्ये घरगुती बायोडिझेल उत्पादनामध्ये 1 लिटर तेलापासून 900 मिली बायोडिझेल मिळते.

### *9) ग्लिसरीन उद्योग :—*

वरील प्रमाणे बायोडिझेलच्या निर्मिती मध्ये तेलामधून ग्लिसरीन वेगळे केले जात असल्याने बायोडिझेलच्या उत्पादनाबरोबरच ग्लिसरीन निर्मिती होते. याचा उद्योग साबण उद्योगात फार मोठया प्रमाणात मागणी आहे. म्हणूनच ग्लिसरीन उद्योग हा शेतकरी करू शकतात.

### *10) फुल उत्पादन :—*

भारतामध्ये याशिवाय भारताबाहेर फुलांना मोठया प्रमाणात मागणी आहे. भारत व परदेशात फुलांचा वापर विविध सण, कार्यक्रम, डेकोरेशनसाठी करत असल्याने फुलांना मोठी मागणी आहे. यामध्ये प्रामुख्याने गुलाब, जरबेरा, कार्नेशन, निशिगंध, ग्लॅडीओल्स, इत्यादींचा समावेश होतो. व्यापारक्षम फुलशेतीला चालना मिळाल्याने शेतक—यांच्या निव्वळ उत्पादनात भर टाकता येतो. त्यामुळे मुक्त अर्थव्यवस्था व जागतिकीकरणाच्या आव्हानांना समर्थपणे तोंड देता येईल.

### *11) इथेनॉल निर्मिती उद्योग :—*

भारतात मोठया प्रमाणात पेट्रोल व डिझेलच्या किंमती वाढत आहेत त्या किंमती कमी करण्यासाठी पेट्रोल व डिझेल मध्ये वापरण्यात येणा—या इथेनॉल या इंधनाची निर्मिती करण्याची गरज आहे. इथेनॉल मिश्रित पेट्रोल व डिझेल मुळे पेट्रोल व डिझेलचा कमी वापर होईल व नैसर्गिक खनिजतेलाच्या तुटवडयावर एक उपयुक्त पर्याय म्हणून इथेनॉलकडे पाहता येईल. आज इथेनॉल निर्मिती करणे काळाची गरज आहे. त्यामुळे भविष्यात इथेनॉलला मोठया प्रमाणात मागणी निर्माण होणार असल्याने इथेनॉल निर्मिती उद्योगाला प्राधान्य देणे गरजेचे आहे. इथेनॉलच्या निर्मितीसाठी आवश्यक असणारा कच्चा माल (ऊस) कृषी क्षेत्रामध्ये निर्माण होत असल्याने शेतकरी ऊसाची निर्मिती करून जास्त फायदा मिळवू शकतो.

### *12) आर्थिक व मनुष्यबळाची गुंतवणूक :—*

शेतामध्ये मशागत करणे, लागवड करणे, पिकांवर औषधे फवारणी, पिक काढणी, मळणी इत्यादी कारणासाठी मनुष्यबळाची गरत असते. त्यामुळे शेतीमध्ये आर्थिक व मनुष्यबळाची गुंतवणूक करता येवू शकते. या गुंतवणूकीमुळे शेतकरी इतर गुंतवणूकीसारखा किंवा त्यापेक्षा

जास्त फायदा/नफा मिळवू शकतो. शेतक—याने त्याने गुंतवलेल्या पैशाचा जास्तीत जास्त फायदा मिळवण्याचा प्रयत्न केल्यास तो मजुराच्या उत्पादन क्षमतेचा मोठया प्रमाणात वापर करून घेवून जास्त नफा मिळवू शकतो.

### *13) व्हॅल्यू ॲडेड प्रोडक्ट :—*

व्हॅल्यू ॲडेड प्रोडक्ट म्हणजे ज्या उत्पादनांना अधिक मूल्य प्राप्त करून दिले जाते. उदाहरणार्थ शहरी भागातील नवरा—बायको दोघे कामावर जात असल्याने त्यांना कमी वेळ असतो म्हणून भाज्या चिरून त्याचे पॅकींग करून विकणे, मटर सोलून देणे, पापड, करडई, तयार करून देणे, धान्य दळून पॅकींग करून देणे इत्यादी व्यवसाय करता येवू शकतात. यामध्ये शेतकरी स्वतःच्या शेतामध्ये फळे, भाजी इत्यादींचे उत्पादन करून त्याला मूल्य प्राप्त करून देवू शकतो व त्यापासून मोठया प्रमाणात नफा मिळवू शकतो कारण भाजी व फळांना सामान्यपणे मिळणा—या किंमतीपेक्षा जास्त किंमत यामध्ये मिळते.

### *14) 'शहराकडे चला' या संकल्पनेला छेद देता येईल :—*

आजच्या तरूणपिढीचा जास्त ओढा शहराकडील फास्ट आणि उंच राहणीमानाकडे असल्याचे दिसते. त्यामुळे शहरामध्ये मोठया प्रमाणात गर्दी वाढल्याचे दिसते. शहरामध्ये अतिरिक्त लोकसंख्येचा ताण व वाढल्याचे दिसून येते या अतिरिक्त लोकसंख्येला शेती व्यवसायामधून मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी व भरपूर नफा मिळवता येवू शकतो. त्यामुळे गांधीजीने म्हटल्याप्रमाणे खेडयाकडे चला ही संकल्पना खरी करता येईल.

### *15) फळे व भाजीपाला प्रकिया उदयोग :—*

विविध प्रकारच्या फळे व भाज्यांपासून प्रक्रियायुक्त पदार्थ करताना त्यातील रसाचे व गराचे प्रमाण, साखर व आम्लतेची माहिती असणे गरजेचे आहे यामध्ये अनारदाना, मनुके, आवळा कॅन्डी, टुटीफुटी, वाईन, चिंचेपासून गर, जाम, जेली व पावडर तयार करण्यात येते , टोमॅटो केचप, बटाटा वेफर्स, पालेभाज्या सुकविणे, त्यांचे लोणचे तयार करणे इत्यादी वेगवेगळे व्यवसाय शेतकरी करू शकतात. शेतक—याने वरील फळे व भाज्यांचे उत्पादन स्वतःच्या शेतात करून त्यावर प्रकिया करून पदार्थ निर्मिती केली तर त्याला त्यापासून होणारा नफा मोठया प्रमाणात मिळतो.

### *संदर्भ :—*

1. कृषि हस्त पुस्तिका
2. कृषिदर्शनी 2008, 2009, 2010, 2011, 2012
3. कृषी डायरी
4. कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्र, राहुरी आठफाटा बारामती
5. केंद्रीय कृषि संशोधन केंद्र
6. बळीराजा मासिक
7. दैनंदिन वृत्तपत्र (ॲग्रोवन) सकाळ, लोकमत, पुढारी
8. इंडियन जरर्नल ऑफ कॉमर्स, न्यू दिल्ली
9. महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
10.इकोनॉमिक ॲण्ड पॉलिटीकल विकली, मुंबई
11.बिझनेस स्टॅान्टर्ड न्यूज पेपर
12.इंडियन टुडे जरर्नल
13. www.icar.org.in/cari./index.htm.
14. www.cishlko.org.
15.www.cifa.in.
21.www.nrc-map.o

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com